दिनांक ०५/०९/२०२६.

'शिक्षक दिन'

पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक कॉलेज ग्रंथालय विभागामध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त **शिक्षक दिन** साजरा केला.



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

शिक्षक दिन

* भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर रोजी झाला होता.
* १९६२ मध्ये त्यांनी राष्ट्रपतीपदाची धुरा सांभाळली, तेव्हा त्यांच्या काही विद्यार्थ्यांनी त्यांचा वाढदिवस साजरा करण्याची इच्छा व्यक्त केली.
* त्यावर राधाकृष्णन यांनी, "माझा वाढदिवस वेगळा साजरा करण्याऐवजी ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून पाळला, तर मला अधिक अभिमान वाटेल," असे सांगितले.
* तेव्हापासून भारतात १९६२ पासून दरवर्षी हा दिवस शिक्षकांच्या आदरासाठी व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो.



शिक्षक दिनाचे महत्त्व

शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देणारे आणि भविष्य घडवणारे शिल्पकार असतात.
ते केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर चांगले संस्कार आणि जगण्याची दृष्टी देतात.
विद्यार्थ्यांच्या यशामागे आणि त्यांना आत्मविश्वासाने उभे करण्यात शिक्षकांचे अमूल्य योगदान असते.
या दिवशी शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भाषणे आणि सत्कार सोहळे आयोजित केले जातात.



"शिक्षण म्हणजे उत्तम भविष्याचा पाया, तर शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना योग्य दिशा देणारा शिल्पकार. शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!"

"गुरुविण न मिळे ज्ञान, ज्ञानाविण न होई जगी सन्मान! सर्व आदरणीय शिक्षकांना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा."

"केवळ पुस्तकेच नव्हे, तर मनापासून शिकवणाऱ्या आणि कुटुंबाप्रमाणे काळजी घेणाऱ्या सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!"







शिक्षक दिन या दिवसाचे अवचित्य साधून पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथालयांमध्ये मोठया उत्साहाने त्यांची जयंती साजरी केली या जयंतीस कॉलेजच्या प्राचार्या डॉ. व्ही. एस. बॅकॉड मॅडम ग्रंथालयाचे सहाय्यक ग्रंथपाल श्री. एस. यु. खेडेकर सर व सर्व विभागाचे विभाग प्रमुख आणि ग्रंथालय कमिटी मधील सर्व सदस्य यांनी सक्रिय सहभाग घेतला या जयंतीला सर्व विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनी यांनी अतिशय मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली हा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला.



शिक्षक दिनाचे नियोजन ग्रंथालय विभागातून श्री. सोमनाथ खेडेकर सर यांनी केले.